"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

**कार्यालय फोन** : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**

**कार्यालयीन वेळ** : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

**।। अजीर्णे भोजनं विषम् ।।**

मूल्य रु. ५

**क्रमांक २ वर्ष : ४४ जुलै–सप्टेम्बर २०२२**

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## महिलांचा स्नेहमेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेहमेळावा समारंभ यंदा जोगेश्वरी व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख** : शुक्रवार १९ ऑगस्ट

**स्थळ** : रामेश्वर मंदीर, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू)

**वेळ** : संध्याकाळी ५ ते ७

संघ कार्यकारिणी तर्फे

**शुभदा कसबेकर, शांता पालेकर**

**ठाणे**

**तारीख** : शुक्रवार १२ ऑगस्ट

**स्थळ** : दीपा मुझुमदार यांचे निवासस्थान, आनंद टॉवर, आनंद पार्क,रुतुपार्क जवळ, ठाणे(प)

**वेळ** : संध्याकाळी ५ ते ७

ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे

| **सुरेखा पालेकर** | **दीपा मुझुमदार** |
|---|---|
| ९०८२६६२०१९ | ९९२०२६३१८६ |

## ठाणे मंच आयोजित, अनुभव हॉलिडेज यांच्या सहकार्याने

## चार दिवसाची सहल

**चेट्टीनाड, मदुराई, मीनाक्षी मंदिरे**

तारीख : १८ ते २१ सप्टेम्बर २०२२

प्रवास : येण्याजाण्याचा विमानाने

शुल्क : एका खोलीत दोन रु. २४७५० प्रतिव्यक्ती + विमान भाडे + GST

एका खोलीत तीन : रु. २२७५० प्रति व्यक्ती + विमान भाडे + GST

शुल्क भरल्यानंतर अनुभव हॉलिडेजचे नियम लागू

अधिक माहितीसाठी

| **सुरेश पालेकर** | **राजेश दिवेकर** | **गिरीश रेगे** |
|---|---|---|
| ८९२८८५०१९३ | ९६१९३६२४६० | ९९२२९६८७२५ |

## संपादकीय

### मुंबईतील जोगेश्वरी येथील प्रति मंगेशी अशा श्री रामेश्वर मंदिराच्या सुशोभीकरणानिमित्त अवर्णनीय सोहळा

जोगेश्वरी येथील श्री रामेश्वर मंदिराच्या स्थापनेला आणखी तीन वर्षांनी शंभर वर्षे पूर्ण होतील. कुठल्याही धार्मिक स्थळाला शंभर वर्षे पूर्ण झाली की त्याचा उल्लेख तीर्थक्षेत्र असा करण्याची प्रथा आहे. शंभरीच्या सोहळ्याची पूर्वतयारी म्हणून गेल्या वर्षभरात मंदिराचे सुशोभीकरण करण्यात आले. सुशोभीकरणांतर्गत शिल्पकला, चित्रकला व वास्तुकला यांचा त्रिवेणी संगम साधण्यात आला आहे. गोमंतकातील श्री मंगेश, श्री शांतादुर्गा, श्री महालक्ष्मी, श्री महालसा, श्री देवकीकृष्ण, साखळीचे दत्तदेवस्थान या मंदिरांची हुबेहुब चित्रकृती सभागृहाच्या भिंतीवर अनुभवता येते. मंदिराच्या प्रवेश द्वाराशी श्रीगजराज व द्वारपाल भक्तांच्या स्वागतासाठी सिद्ध आहेत. आपल्या सर्व ज्ञातिबांधवानी या सुशोभित मंदिराचे जरूर दर्शन घ्यावे.

मंदिराच्या सुशोभीकरणाच्या कार्याचे श्रेय सर्व उत्साही भक्तगणांना प्राप्त होते. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १४, १५ व १६ मे या तीन दिवसांत विविध देवकृत्ये व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. मंदिराचे पुरोहित श्री. तुळसीदास सुखटणकर व सातारा येथील वेदशास्त्रनिपुण विवेक गोडबोले गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली व इतर गुरुजनांच्या सान्निध्यात ही सर्व देवकृत्ये यथासांग पार पडली.

पहिल्या दिवशी मंदिराचे पावित्र्य बांधकामानंतर पुन:प्रस्थापित व्हावे या हेतूने 'प्रासाद वास्तु शांती' करण्यात आली. सायंकाळी सूर प्रतिष्ठानतर्फे 'गदिमा संगीत रजनी' हा गाण्यांचा कार्यक्रम झाला. याला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. दुसऱ्या दिवशी 'नवचंडी'चे आयोजन करण्यात आले व श्रीशांतादुर्गा देवीचे आशीर्वाद प्राप्त करून घेतले. नंतर मंत्रजागरात पूर्णाहूती संपन्न झाली व महाप्रसादाचे वितरण झाले. महाप्रसादाचे वैशिष्ट्य म्हणजे कारवारकरांसाठी अप्रूप असे पुरी–मडगणे व अनसा पनसाची भाजी हे चविष्ट जिन्नस होते. यामुळे सर्व मंडळी तृप्त झाली. तिसऱ्या दिवशी श्री रामेश्वरावर सर्व विश्वस्तांच्या बैठकीत लघुरुद्राभिषेक करण्यात आला व तदनंतर द्वादश कलशार्चन अभिषेक केला गेला. रात्रौ वसंतपूजा समर्पित करून भक्तजनांच्या कल्याणाप्रीत्यर्थ गाऱ्हाणे घालण्यात आले व तीन सुवर्णदिनाच्या सोहळ्याची सांगता झाली.

या कालावधीत मंदिरासमोरील पटांगण सजविण्यात आले होते व नयनरम्य रोषणाई करण्यात आली होती. प्रत्येक दिवशी रंगीबेरंगी फुलांनी सजविलेली श्री रामेश्वराची आकर्षक मूर्ती सर्वांचे लक्ष वेधीत होती. गाभाऱ्यातील व सभागृहातील देवकृत्ये बसल्याजागेवरून पहाता यावेत म्हणून व्हिडिओ शूटींगद्वारा मोठ्या डिजीटल पडद्यावर दाखविण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. एकंदरीत हा सोहळा सर्व उपस्थित भक्तजनांच्या कायम स्मरणात राहील असा झाला.(श्रीरामेश्वर मंदिराचे एक उत्साही विश्वस्त श्री. उदय नाडकर्णी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे)

१ जुलै २०२२

द.ना.नाडकर्णी



## एज्युकेशन सोसायटी – गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षीसे दिली जातात. बक्षीसाची पात्रता पुढीलप्रमाणे

| परीक्षा | | किमान पात्रता |
|---|---|---|
| दहावी | | ८०% |
| बारावी | | ७५% |
| – | विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | वाणिज्य | ७०% |
| | कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | | ६०% |
| एम.ए.एम.कॉम., एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस्, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी | | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यातीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही कर्जाचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १५ ऑक्टोबर २०२२**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, **Email** व संपूर्ण पत्ता **The NKGSB Ind & Education Society Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004** या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

* विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कॅनडात असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असणाऱ्या पाहिजेत.
* बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
* ज्या डॉक्टर्सनी एम.एस. किंवा एम.डी.साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
* गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशीरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.

# प्रकाश झोत

## डॉ. निनाद गंडभीर यांचा 'अकल्पित' कथासंग्रह प्रकाशित

पोलीस व डॉक्टर यांचा व्यवसायच असा आहे की समाजातल्या विविध घटकांशी त्यांचा वारंवार निकटचा संबंध येतो. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना किंवा व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीनुसार पोलीसाकडे आलेला प्रत्येक तक्रारदार व आरोपी आणि डॉक्टराकडे आलेला प्रत्येक पेशंट यांचे रसायनच वेगवेगळे. माणसांची अनेक रूपे व स्वभावाचे अगणित पैलू पोलिसांच्या व डॉक्टरांच्या अनुभवाला येतात. यातील काही काही रोमहर्षक घटना सिनेमाचे किंवा नाटकाचे कथानकही होऊ शकतात. हे सर्व अनुभव लिखित स्वरुपात वाचकांपुढे मांडल्यास मनोरंजक साहित्याचं एक वेगळेच दालन होईल. आपल्याच ज्ञातीपैकी दोन वरीष्ठ पोलीस अधिकारी कै. रमाकांत कुलकर्णी व कै. विठ्ठल वागळे यांनी आपल्या अनुभवावर आधारित बरेच लेखन केले आहे. वैद्यकीय क्षेत्रांत विशेष दखलपात्र लेखक डॉक्टर्स म्हणजे डॉ. सदानंद नाडकर्णी (माझे प्रिस्क्रीप्शन), डॉ. रवी बापट (वॉर्ड क्रमांक ५), डॉ. रामाणी (ताठ कणा), डॉ. श्रीखंडे (आणखी दोन हात), डॉ. बावडेकर (कॅन्सर माझा सांगाती) इत्यादी. डॉक्टरांच्या या मांदियाळीत माहीम येथील डॉ. निनाद महादेव गंडभीर यांनीही प्रवेश केला आहे. त्यांचा अलीकडेच 'अकल्पित' हा सत्यघटनेवर आधारित एक कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. त्यांचा दवाखाना परळ येथील कामगार वस्तीत आहे व ते तेथे फार लोकप्रिय आहेत. सध्याच्या जमान्यात फॅमिली डॉक्टर ही संकल्पना रद्दबादल होण्याच्या मार्गावर आहे. डॉ. गंडभीर त्याला अपवाद आहेत. त्यांच्या दवाखान्याच्या परिसरातील अनेक कुटुंबाशी वर्षानुवर्षे त्यांचा घरोबा आहे. त्यांच्या समृद्ध अनुभवाचा भाग इतरांपर्यंत पोहोचावा म्हणून त्यांनी २० कथांचा हा संग्रह प्रकाशित केला आहे. त्या सर्व चित्तथरारक आहेत एवढेच नव्हे तर काही अंतर्मुख करणाऱ्याही आहेत. सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक व डॉक्टरांचे एक पेशंट व मित्र श्री. केदार शिंदे यांनी या पुस्तकाला हृदयस्पर्शी प्रस्तावना लिहिली आहे. डॉक्टर स्वत: कुठलीही घटना रंगवून सांगण्यात तरबेज आहेत. तेव्हा द. मा. मिरासदार जसे कथालेखन व कथाकथन करतात त्याचप्रमाणे डॉक्टरांनीसुद्धा यापुढे आणखी कथालेखन व कथा कथन करावे ही सदिच्छा. ('अकल्पित' लेखक डॉ. निनाद गंडभीर ९८२०१४२०९४, मूल्य रु. २००. मॅजिस्टिकच्या सर्व केंद्रावर उपलब्ध.)

## यशस्वी उद्योजक श्री. सतीश वाघ यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा

फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायजेशन्स या केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या विभागातर्फे प्रतिवर्षी लक्षणीय निर्यात करणाऱ्या उद्योजकांचा सन्मान करण्याकरिता 'निर्यातश्री' हा पुरस्कार देण्यात येतो. यंदाच्या १७ व्या वर्षाचा पुरस्कार सुप्रिया लाईफ सायन्सचे सर्वेसर्वा श्री. सतीश वामन वाघ यांना बहाल करण्यात आला आहे. आतापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत व त्याची वेळोवेळी मुखपत्रिकेने दखल घेतली आहे. 'निर्यातश्री' या पुरस्काराने त्यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला गेला आहे. श्री. वाघ यांचे हार्दिक अभिनंदन. ( पुढील मजकूर पृष्ठ. १२ वर)



# माझी माय अन्नपूर्णा

## कै. पार्वती शंकर (शुकबाप्पा) नाडकर्णी

माय मरो अन् मावशी उरो असे म्हणतात हे माझ्या बाबतीत सत्य आहे. माझी आई होती पण मला खरी माया माझ्या 'मावशी'कडून मिळाली. कारण मी शिक्षणासाठी गडावर माईकडे होते. दोघींनीही माझ्यावर भरभरून प्रेम केले. उत्तम संस्कार केले.

किती आठवणी मनात दाटतात
आठवते ते सुखद बालपण
ती मायेची, वात्सल्याची उब
डोक्यावर ठेवलेला वरदहस्त
आज ते बालपण आठवते.

कवयित्री सुभद्राकुमारी चौहान म्हणतात.

बार बार आती है मुझको मधुर याद तेरी
गया ले गया जीवन की खुशियाँ मेरी ।

माझी ही स्थिती अशीच झाली आहे. दादाचे बोट धरून मी आले अन् माईचे बोट पकडले. माई मुळची 'पैंगीणी'ची प्रभु. विवाहानंतर ती 'पार्वती' झाली. पण गडावरचे लोक, नातेवाईक, बाप्पांची मित्रमंडळी तिला 'माई' या नावानेच ओळखायचे. माई खूप सुगरण होतीच पण अन्नपूर्णादेखील होती. शुकबाप्पांना भेटायला अनेकजण येत असत. माई त्यांचे हसून स्वागत करून खायला घालायची. माझी मावस भावंडे म्हणजे चंपाताई, सुरेश, अरविंद अन् निर्मल. त्याचबरोबर लक्ष्मण मामा अन् दिगंबर मामा असा गोतावळा होता. पण त्या कधीच त्रासल्या नाहीत तर कधी ओरडल्या नाहीत. त्यामुळे आम्ही भावंडे खूप धमाल करायचो. रात्री जेवण झाल्यावर आम्ही निवांतपणे देवघरात बसून गप्पा मारायचो. माईसुद्धा आमच्यात सामील होत असे.

मी नृत्य अन् मिमीक्री करायची तर निर्मल गाणे गात असे. सुरेश ठेका धरायचा. खूप मजा यायची. टाळ्या पिटायला बाकीची मंडळी होती. मी बरीच खोडकर होते. कधी कधी तिचे ऐकत नसे पण ती कधी रागावल्याचे आठवत नाही. फक्त लटका हात उगारायची. आज मला वाटते की तो श्रीशारदादेवीचा वरदहस्त सतत माझ्या सोबत आहे.

आजपर्यंत निर्मल अन् मी जणू जुळी भावंडे. ती खूप शांत व समंजस आहे. पण मी तशी नाही. पण आजही आम्हाला एकमेकीशी बोलल्याशिवाय रहावत नाही.

एक घटना आठवते. श्रावणी सोमवार बाप्पाकडे धुमधडाक्याने साजरा होत असे. एकदा माई म्हणाली, ''कुंदा, सावरपैला जाऊन काकीकडून 'हळदी'ची पाने आण.''

पुरुषोत्तमकाकाची कमल अनसुया माझ्या मैत्रिणी. लहान वय त्यामुळे खेळात रमले. संध्याकाळ झाली. रस्त्याच्या कडेला 'कचऱ्या पीठ' (तवकील) झुडूपे होती. मी त्याची पाने तोडून घेतली. त्या पानांना सुगंध असतो.

रात्री मी अन् निर्मल लवकर झोप असू. अचानक मला जाग आली. माजघरात सगळे 'पोस' (खरवस) खात बसले होते. हळदीच्या पानांचा वास छान आहे असे मामा म्हणाला. मी जोराने ओरडले, तुम्ही पोस खाऊ नका. ती कचऱ्यापीठाची पाने आहेत. आता सगळी मरणार या भीतीपोटी मी जोरजोराने रडू लागले. माई चिडली नाही तर मला जवळ घेऊन समजावले की कचऱ्यापीठ आपण खातो. तू झोप. अशी होती माझी माई.

आमचे बाप्पा अन् माई म्हणजे शंकरपार्वतीची प्रेमळ जोडी. माझे शिक्षण, विवाह तिथेच झाले. किती आठवणी सांगू?

हा लेख माझ्या अत्यंत प्रिय बाप्पा अन् माईला समर्पित करते. तुमच्यामुळेच मला नावलौकिक मिळाला. त्रिवार वंदन!

**– कुंदा र. देसाई**
९८१९०५२३१९

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०२२ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची दखल घ्यावी.

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| **तन्वी गुरुनाथ नेत्रावळी, न्यू जर्सी,** | व | **निखील राजेन्द्र कुलकर्णी, कॅलिफोर्निया** |
| **संजना राजीव वागळे, कॅनबरा** | व | **नीलेश गोवण्डे, कॅनबरा** |
| **ध्रुव विवेक दिवेकर, न्यूझीलंड** | व | **प्रियांका शिवसूथन, न्यूझीलंड** |





**श्रीमती स्मिता नाडकर्णी यांचे पाककलेवरील 'Smita's GSB Treasure' नावाचे You tube channel**

(दहिसर येथे राहणारे कै. अजित विठ्ठल (ब्रुकबाँड) नाडकर्णी यांच्या पत्नी श्रीमती स्मिता या पाककलेमध्ये कुशल आहेत. आपल्या ज्ञानाचा इतरांना उपयोग व्हावा म्हणून त्यांनी **'Smita's GSB Treasure'** या नावाचे **You tube channel** सुरू केले आहे. त्यातील एक पाककृती त्यांच्याच शब्दात.)

**१. आंबट भेंडा (भाजीचा आंबटगोड प्रकार)**

**साहित्य :** छोटी भेंडी पाव किलो. मोठी भेंडी घेतलीच तर दोन किंवा तीन तुकडे करावे, एक लिंबाएवढा गुळाचा खडा अथवा पावडर गुळ, २ लिंबाएवढी चिंच पाण्यात शिजवून त्याचा पाक काढून घ्यावा.

ओले वाटण १:२ टी स्पून धणे, १ टी स्पून हळद, २ टी स्पून मिरची अथवा १० बेडगी मिरच्या देठ काढून घ्यावा. छोट्या मिक्सीच्या भांड्यात वाटून घ्यावे.

ओले वाटण २:१ वाटी ताजे ओले खोबरे, त्यात कर्धा टी स्पून अख्खे तांदूळ घालून वेगळे वाटून घ्यावे.

**खोबऱ्याचा रस :** २ वाटी खोबऱ्याचा जाड आणि पातळ वेगळा रस काढून ठेवावा. फोडणीसाठी खोबरेल तेल अर्धा वाटी, राई व चांगल्या प्रतीचा हिंग व एक चमचा मेथी.

**कृती :** प्रथम भांड्यात खोबरेल तेल घालून तुकडे केलेले भेंडीचे तुकडे अर्धे परतून घ्यावे. म्हणजे त्याचा बुळबुळीतपणा नाहीसा होतो. परतलेले भेंडीचे तुकडे एका वेगळ्या डिशमध्ये काढावे. त्याच भांड्यात फोडणीसाठी जरुरी इतके खोबरेल तेल घालावे. खडा हिंग असल्यास आणि एक टी स्पून मेथी प्रथम फोडणीला टाकावी. मेथी लाल लाल होताच राई फोडणीला घालावी. फोडणी तयार झाल्यावर लाल मिरचीच्या वाटणात पातळ रस घालून ते फोडणीला टाकावे. उकळी आल्यावर त्यात भेंडी घालावी. भेंडी जरा शिजल्यावर त्यात गुळ व चिंच घालावी (चवीप्रमाणे). भेंडी पूर्ण शिजल्यावर त्यात खोबऱ्याचे वाटण घालून एक उकळी आणावी आणि नंतर त्यात जाड रस घालावा. मीठ घालावे व एक उकळी आणावी. त्याची चव **'आंबट–गोड–तिखट'** लागते. ही रेसीपी सुरुवातीला नमूद केलेल्या चॅनेलवर पाहू शकता.

**–स्मिता अजित नाडकर्णी,** दहिसर
९३२४३ ८३०२२

## सुख म्हणजे काय असते रे!

कारवारच्या हिंदू हायस्कुलमध्ये १९५२ मध्ये घडलेली ही घटना आठवली!

मराठी भाषेचा वर्ग होता. शिक्षिका सुखटणकर बाईंनी सर्व मुलांना – 'मन द्विधा होणे' हा वाक्प्रचार वापरून एखादे वाक्य बनविण्यास सांगितले.

आम्ही सर्वांनी आम्हाला असे करायचे होते पण भलतेच झाले त्यामुळे मन द्विधा झाले असे काहीतरी तीनचार वाक्यांत लिहिले. बाईंनी प्रत्येक विद्यार्थ्याला त्याने लिहिलेले वाक्य उभे राहून वाचण्यास सांगितले. मीही माझे वाक्य वाचून मोठ्या अभिमानाने खाली बसलो. शेवटी शिवराम बर्वे या मुलाची पाळी आली. शिवराम – किरकोळ शरीराचा. खेळ, मस्करी वगैरेपासून अगदीच अलिप्त. शांत स्वभावाचा, हलकेच जागेवरून उठला आणि म्हणाला ''विहीरीच्या काठावर उभ्या असलेल्या बाईचे मन द्विधा झाले होते.''

फक्त सुखटणकरबाईंनी टाळ्या वाजविल्या! आमच्या डोक्यात हा वाक्प्रचार-प्रयोग शिरायला ३-४ मिनिटे लागली. जसा जसा वेळ गेला, तसा तसा शिवरामबद्दल अधिक कौतुक, आदर आणि तितकेच स्वत:च्या मराठी भाषेच्या ज्ञानाची कींव यायला लागली. तेव्हाच मनाने ठरविले की हे मराठी लेखन वगैरे काही आपला प्रांत नाही.

माझा पहिला लेख 'मुखपत्रिके'त यायला २०१५ साल उजाडावे लागले – म्हणजेच ६३ वर्ष लागली. हाही एक अपघातच होता. माझे परममित्र श्री. डी. एन्. नाडकर्णी (म्हणजेच आमचा आवडता शाळेतला ''तोत्या''). जे मुखपत्रिकेचे गेली ४४ वर्षे संपादक आहेत. मला म्हणाले की हिंदू हायस्कुलवर काही लिहिता आले तर बघ. हिंदू हायस्कुलमध्ये काढलेली पाच वर्षे माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची वर्षे होती. माझ्या जीवनाला संपूर्ण यशस्वी कलाटणी केवळ या पाच वर्षात मिळालेल्या संस्कारामुळेच शक्य झाली. मला खात्री आहे आज मी जो काही आहे ते केवळ हिंदू हायस्कुलमधील पाच वर्षांच्या संस्कारामुळेच शक्य झाले.

हिंदू हायस्कूलचे मास्तर. त्यांचे सात्विक चेहरे, शिकविण्याची पद्धत, स्वत: ग्रॅज्युएट असूनही तोकड्या पगारावर केलेली शाळेची असीम सेवा! विद्यार्थ्यांना अमूल्य शिकवण, केवळ शालेय परीक्षेसाठीच नव्हे, तर स्वार्थत्याग, भक्तीभाव, केवळ थोरांचाच नव्हे तर गरीबांचाही आदर करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांत निर्माण झाली तर त्याला हिंदू हायस्कुल आणि त्यातले ऋषितुल्य गुरुजनच कारणीभूत होते – त्यांनी तसे आयुष्य स्वत:च जगून प्रत्यक्ष उदाहरणच दिले.



मला अध्यात्माची खूपच आवड होती. इतकेच नव्हे तर मी त्या विषयांवर बरीच पुस्तकेही वाचली होती. हृषीकेशचे स्वामी शिवानंद, खासकरून मुंबईकरांच्या जास्त परिचयाचे स्वामी चिन्मयानंद यांच्याशी माझा पत्रव्यवहारही होता. श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे अठराही अध्याय माझे अगदी मुखोद्‌गत होते. दरवर्षी मुंबईच्या क्रॉस मैदानावर होणारे स्वामी चिन्मयानंदांच्या गीतेवरील प्रवचनास मी अगदी आवर्जून हजर असे. स्वामी शिवानंदांच्या Mind and its mysterious control व इतर पुस्तकांची मी पारायणे केली होती.

कारवारहून १९५४ साली एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यावर बाबांची बदली कलकत्त्याला झाल्यामुळे तेथील सेंट झेव्हीयर्स कॉलेजमधून इंटर सायन्सची परीक्षा दिली. मी रामकृष्ण मिशनच्या मठात संन्यासी होण्याच्या उद्देशाने घरून पळून गेलो होतो. पण तिथल्या स्वामीजींनी मला दीक्षा देण्यास नकार दिला. कारण माझी वयाची १८ वर्षे पूर्ण झाली नव्हती. त्यांनी मला १८ वर्षे पूर्ण झाल्यावरच येण्यास सांगितले. इतकेच नव्हे तर सोबत बाबा आणि आई या दोघांनी सह्या केलेले, स्पष्ट परवानगी दिल्याचे पत्र आणण्यास सांगितले जे कदापि शक्यच नव्हते.

त्या क्षणापासून माझे आध्यात्मावरील वेड पूर्णपणे मनातून उतरले व मन उलट दिशेला भिरकावले गेले.

कुठलेही व्यसन करण्यास चुकलो नाही. सर्व व्यसनांचा अगदी मनसोक्त आस्वाद घेतला. पण शांताईच्या कृपेने कुठल्याही व्यसनाच्या पूर्ण आहारी गेलो नाही.

तऱ्हेतऱ्हेच्या सिगारेटी ओढणे, सर्व प्रकारचे मद्यप्राशन! इतकेच नव्हे तर मद्याची वेगवेगळी ''कॉकटेल्स'' बनविण्यात माझा हातखंडा होता. याबद्दल इतके सखोल ज्ञान!

घोड्यांच्या रेसीस आणि त्याचा पूर्ण अभ्यास! माझ्याकडे वहीत जवळजवळ ३०० घोड्यांचा संपूर्ण इतिहास होता. १) क्लास V-B पासून क्लास I पर्यंत प्रत्येक घोड्याचा प्रगतीचा आलेख, २) प्रत्येक घोड्याची पेडिग्री (वंशावळ), ३) घोड्याचे वय! ४) प्रत्येक घोड्याचे धावण्याचे आवडते योग्य अंतर आणि तंत्र, ५) ठराविक घोड्यांना पूर्णपणे जाणणारे स्वार (Jockeys) वगैरे वगैरे. घोड्यांच्या रेसमध्ये मी भरपूर कमवले. काही जॅकपॉटस्‌ही मिळाले होते. या व्यसनाची पहिली सुरुवात दोघांची मिळून एक दहा रुपयाचे तिकीट घेतले होते व पाच रुपये जिंकलो! प्रत्येकी रुपये साडेसात मिळाले. नंतर एकावेळी लाख रुपयांपर्यंतही घोड्यावर लावण्याइतकी मजल गेली होती. केवळ रेस खेळण्यासाठी पुणे आणि बेंगळुरुलाही अनेकदा भेटी दिल्या. कारण पावसाळ्यात मुंबईला रेसेस बंद

असतात. जेवढे कमविले ते सर्व रेसकोर्सवरच घालविले. सर्व हिशोब ठेवला होता पण सबंध या रेसेसच्या व्यसनांत. पाच एक वर्षात मी जवळ जवळ रेसमध्ये एकूण रु. दोन हजार फायद्यात राहिलो. आणि नंतर अकस्मात शपथ घेतली आणि गेल्या ४० वर्षांत मी कुठल्याही रेसकोर्सवर पायही ठेवला नाही. इतरही बरेच नाद होते. पण शांताईच्या कृपेने मी कुठल्याही प्रकारच्या व्यसनांच्या आहारी गेलो नाही.

जवळ जवळ पाच वर्षे मी "Orbit Travels" या प्रख्यात कंपनीत सेल्स डायरेक्टर होतो आणि या पाच वर्षात जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांत अनेकदा, तेही विमानाच्या सर्वोच्च क्लासमधून फुकटात प्रवास करण्याचा योग आला. ऑर्बिटच्या कामानिमित्त मला या पाच वर्षात, युरोपला २६ वेळा जावे लागले. एकदा तर पहाटे मी जर्मनीहून घरी आलो आणि काही अर्जंट कामानिमित्त त्याच दिवशी रात्री मला जर्मनीला परत जावे लागले. कदाचित काहींना ही लोणकढी थाप वाटेल पण माझ्या पासपोर्टवर या सर्व एंट्रीज आहेत.

मागे कुठेतरी वाचनात आले होते – ''सुख म्हणजे काय असते रे – दादा!''

मला वाटते सबंध आयुष्यात जे मी भोगले ते सुखच असावे! त्यात सापडलेले खाचखळगे पण सुखाचाच भाग असावा.

आणि हे सर्व शक्य झाले त्याला कारण शांताईची माझ्यावर असलेली असीम कृपा!

**अरुण भास्कर कसबेकर**

मो. ९८२०२९१३६५/८७७९९८६६०६

**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## प्रकाश झोत

( पृष्ठ. ५ वरून)

### ब्रिगेडीयर डॉ. राजीव दिवेकर यांचे नावीन्यपूर्ण पेटंट प्रकाशित

पुणे येथील प्रख्यात सिम्बॉयिसीस इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीस याचे संचालक आहेत. ब्रिगेडीयर डॉ. राजीव गोपाळकृष्ण दिवेकर. कुठल्याही कार्यालयातील कर्मचाऱ्यांची हजेरी व आरोग्यस्थिती याची अभिनव पध्दतीने नोंद करण्याची आधुनिक प्रणाली त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत विकसित केली व त्याबद्दल त्यांना पेटंटही मिळाले हे कौतुकास्पद आहे. संशोधन लेखाचे शीर्षक आहे. 'A unified contact less monitoring and recording system of attendance and health of employees.' डॉकरांचा २०१७ साली ज्ञाति बांधवांच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून जाहीर सत्कार करण्यात आला होता व तेव्हांच्या मुखपत्रिकेच्या अंकात त्यांच्या कार्याची ओळख करून देण्यात आली होती.




| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

# श्री रामेश्वर मंदिराच्या सोहळ्याची क्षणचित्रे
(तपशील पृ. ३ वर)



प्रवेश द्वारापाशी श्री गजराज
व द्वारपाल स्वागत
करण्यासाठी सज्ज

पहिल्या दिवशी सातारा
येथील ब्रह्मवृंदांच्या द्वारे
प्रासाद वास्तु शांती कार्यक्रम





प्रासाद वास्तु शांतीनंतर
मंदिराचे मुख्य पुरीहित
श्री तुळसीदास सुखटणकर
यांच्या आधिपत्याखाली
श्रीरामेश्वराचा अभिषेक, विश्वस्त
श्री. उदय नाडकर्णी पत्नी समवेत.



पहिल्या दिवशीच्या सायंकाळी
मंदिरासमोरील प्रांगणात
‘सूर सरस्वती प्रतिष्ठान’ तर्फे
‘गदिमा संगीत रजनी’ कार्यक्रम





सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी
सातारकर ब्रह्मवृंदांच्या शुभहस्ते
मंत्रजागरात नवचंडी हवन

नवचंडी दरम्यान
‘कुमारिका पूजन’





तिसऱ्या दिवशी श्रीरामेश्वराच्या चरणी लघुरुद्र करण्यापूर्वी मंदिराचे सर्व सहा विश्वस्त पुण्याहवाचन दरम्यान प्रार्थना करताना



श्रीरामेश्वराच्या चरणी लघुरुद्राभिषेक, विश्वस्त श्री. प्रणव मुझुमदार पत्नी समवेत.




द्वादश कलशार्चन अंतर्गत मुख्य कलशाची मंदिराच्या प्राकारांत अभिषेक पूर्व मिरवणूक





## कै. माधव धुमे यांची जन्मशताब्दी



आपल्या ज्ञातीतील एक कर्ते पुरुष कै. माधव दुर्गाराव धुमे यांची ११ मे २०२२ ही जन्मशताब्दी. श्री. धुमे यांनी ज्ञातीतील असंख्य तरुणांना महिन्द्र अँड महिन्द्र या कंपनीत सामावून घेतले होते. माहीम येथील ''शांतीनगर' ही मोठी वसाहत बांधून अनेक कुटुंबांना आश्रय दिला. ते आपल्या संघाचे १९६७ ते ७६ या कालावधीत कार्याध्यक्ष होते. श्री. धुमे यांनी ज्ञातीसाठी केलेल्या योगदानाबद्दल आपल्या एज्युकेशन सोसायटीने १९७३ मध्ये भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत करून त्यांचा बहुमान केला होता. श्री. धुमे यांचे मे २०१२ मध्ये वयाच्या ९० व्या वर्षी दुःखद निधन झाले.

त्यांचे अमेरिका स्थित सुविद्य पुत्र श्री. पंकज धुमे यांनी खास मुखपत्रिकेसाठी लिहिलेला एक लेख खाली उद्धृत केला आहे.

Every boy's first hero is typically his father & I was no different. It's been ten years since my father passed away at the age of 90 & he continues to remain my hero at the age of 60. He had such an oversized influence on the family that he inspired even his grandchildren & remains their hero.

Today, May 11th is his 100th birth anniversary and I wish him a very happy birthday. "Baba", that's how we addressed him at home and affectionately by those in his inner circle of friends. He was also addressed as "Dhume saheb" & "Madhav rao", respectfully, by others.

He suffered a traumatic childhood, growing up in poverty & lost his younger brother & mother at a very early age.

However, he never forgot his mother's love & commemorated her in perpetuity by naming the first affordable housing project he built, in her name.

Though fate was cruel to him early in his life, he was gifted with the natural ability to grasp complex things & learn quickly.



He stood first in every grade throughout school and became a master of the English language and mathematics. The family made do with the scholarship money he received and his earnings from working odd jobs through high school. His tough childhood made him steely in his emotions. He believed that God was internal and did not believe in external manifestations. He did not conduct or participate in religious ceremonies except on very rare family occasions when imposed by my mother.

He had unparalleled control on his mind, his determination was solid & he was superbly self-confident. He made friends for life & socialized with them in the gymkhana bar after vigorous games of badminton. He fastidiously took care of his health. He would skip dinner on the days he could not exercise - to remind himself that there was a price to pay for missing exercise. On several trips to the US, he would beat jet lag starting with an exercise on the day of arrival!

He passed the chartered accountancy (CA) exam in India in his first attempt right out of college without doing the accountancy internship. The rules at that time allowed appearing for the exam, but the degree was awarded only after completing the internship. Passing the CA exam in the first attempt without an internship was an astounding record.

After passing his CA exam, a few people from our community helped him get his first job. He kept paying that favor forward throughout his lifetime by employing people from the community and building affordable housing for them.

At a young age, he joined the executive team at one of the largest automotive manufacturers in India where he served till he retired. He was respected by colleagues & friends alike. he served on boards of various companies and served in leadership positions in various organizations. He served as the president of the Bombay Gymkhana, a premier sports club in Mumbai,

president of the Maharashtra State Badminton Association and was a co-founder of Badminton-45 with Mr. Aditya Birla, one of India's leading industrialists of the time. Badminton-45 is an organization focused on encouraging and motivating players above the age of 45. Somewhere in between the ages of 35 and 50 he built many affordable housing projects for his community in the city of Mumbai.

There was a constancy in his life with work, family & friends. He was loyal to his family, his friends and the company where he worked. He was married to my mother for 64 years & worked at the same company for 40+ years. He exercised every day except Saturday and he played badminton either at the Bombay Gymkhana or the Wellingdon Club in Mumbai. He compartmentalized his time with colleagues at the office, with his friends at the clubs & with family at home. Everyone had exclusive access when he was with them.

He was uniquely gifted in his vision. His mantra was "land is the only asset that cannot be manufactured and it's always going to be needed". He bought parcels of land in locations outside various cities in India in the 1960s through the 70s. As a little boy, whenever I accompanied him, I would find it astonishing that land in such remote & sparsely populated places would be worth anything. Within 30 years, as cities expanded with population growth, all those parcels of land were zoned within major city boundaries increasing their values exponentially. For a person who had no shoes to wear till his first job interview, he had tremendous vision, a strong will & amazing self-confidence.

He never watched a movie (Hindi or English) in theaters or on TV. In his childhood he could not afford it and later he felt it was a waste of time. The outcome was that no one in the family watched Hindi movies or TV! He had two passions - reading and playing the sport of badminton. He was a voracious reader, and we were the



beneficiaries of it. He purchased many, many books that would have filled a mini library. He subscribed to magazines and periodicals from India and abroad. Life, Time, Newsweek, illustrated Weekly of India, Readers Digest, daily newspapers, etc. were regular fare for us. Many English classic books were in his library. He was very knowledgeable in history & geography too. He actively played badminton till he was about 75 years & thereafter continued walking long distances for exercise. He pushed me in my teenage years to excel at badminton and was thrilled when I won the junior national tournament for a few years.

He had an aura around him. He made an indelible impression on you in your first meeting. Either he engaged in meaningful conversation with you or you received a thunderous silence. He refused to suffer fools.

He was a man of very few words, never praised nor criticized me. He never imposed his will on me and instead presented me all the luxuries that most children would only dream of. Though he was disappointed that I left India to settle down in the US, he fully supported my decision. He was very happy to see me return to India with family & settle in Pune for almost 10 years in the early 2000s. I knew that he was very happy with how I had progressed through life and knowing that gives me happiness. I am confident he is in a good place now because he helped many people in his lifetime and all the blessings & good wishes he received from them must have surely propelled him faster on the path to salvation.

I wished him on his 90th birthday on May 11, 2012, and he passed away peacefully at home 2 days later.

Thank you, Baba, for your legacy & for your blessings. From all of us, we wish you a very happy 100th birthday remembrance. !

Best regards,
**Pankaj**

**।। श्री मंगेशाची आरती ।।**

जयदेव जयदेव जय जय मंगेशा ।
सुखदात्या कुलदेवा जय मांगिरीशा ।।धृ।।
प्रेमळ लोमेशशर्मा भक्तांचा त्राता ।
सन्मुख श्रीपुरुषोत्तमा बहुभाग्यदाता ।।
सान्निध्यीशिवशर्मा संसारी नेता ।
स्वकुलास्तव गोमांतकि वससी भवनाथा ।।१।।
शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना ।
महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना ।।
सदया महालसाही रक्षी सकलांना ।
दिव्य अशा शक्ती या प्रकटल्या नाना ।।२।।
वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायी ।।
निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं ।
रुद्रस्वरूप शिवमय शंकर सुखदायी ।
प्रगटुनियां भक्तांते पावसि लवलाही ।।३।।
मुलकेश्वर संकटी धांवत ये वेगें ।
साह्य करी भक्ता जे पिडिले भवरोगें ।।
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे ।
नित्य करी संरक्षण राहुनियां मागे ।।४।।
जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते ।
जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते ।।
जय जय लोमेशशर्मा जय दे आम्हांते ।
मुलकेश्वर मंगेशा रक्षी बाळां तें ।।५।।
सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा ।
बाळावरि करुणाघन प्रेमे वर्षावा ।।
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा ।
अर्पी वामन पायी निष्काम सेवां ।।६।।

बहुतेक आरतीसंग्रहांमध्ये गणपती, शंकर, श्रीदेवी, दत्तात्रय, मारुती, विठ्ठल, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या आरत्या जास्त प्रचलित आहेत. आपल्या बहुतेकांचा कुलदेव म्हणजे श्रीमंगेश पण श्रीमंगेशाची आरती प्रचलितांमध्ये नाही. ही उणीव भरून काढण्याचा हा प्रयत्न. ही आरती प्रकांड पंडित श्री. वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी यांनी रचली होती. ती कोणत्या संग्रहात प्रसिद्ध झालेली याची माहिती नाही.
(प्रायोजन सौजन्य : किरण दुभाषी)





**सौ. दुर्गाबाई (गोदू) लक्ष्मीकांत वागळे**
**बाड, कारवार**

**जन्म १० ऑक्टोबर १९४० देवाज्ञा १६ एप्रिल २०२२**

*तुझ्यासारखी आई लाभली हे आमचे भाग्य*
*तुझ्यासारखी सुगृहिणी मिळाली हे वागळे कुटुंबाचे सौभाग्य*
*आता उरल्या तुझ्या केवळ स्मृती*
*दिवस कंठतो आठवणीत तुझ्या सुकृती*
*तुझ्यां आत्म्यास चिरशांती लाभो*
*हीच ईश्वरचरणी प्रार्थना !*

**लक्ष्मीकांत (भानू), राजेंद्र, शोभा, चैतन्य पै,**
**दीपा, दिनेश पै आणि समस्त वागळे कुटुंबीय**

## संघाचे हितचिंतक श्री. विठ्ठल पालेकर यांचे निधन



**जन्मदिन १७.३.१९३५**
**निधन १६.५.२०२२**

ज्ञातीचे एक हितचिंतक श्री. विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर यांचे अलीकडेच १६ मे रोजी दु:खद निधन झाले. ते व्यवसायाने सी.ए. होते. जॉन्सन अँड जॉन्सन या औषध निर्मिती करणाऱ्या जगप्रसिद्ध उद्योगसमुहाचे ते तरुणपणीच कार्यकारी संचालक या अत्युच्च पदावर पोचले होते. सी.ए. असूनसुद्धा औषधनिर्मितीच्या कारखान्यात कार्यकारी संचालक होणे, यातच त्यांच्या कर्तबगारीची जाणीव होते. आपल्या व्यवसाय क्षेत्राशिवाय सामाजिक क्षेत्रांतही त्यांचे योगदान लक्षणीय होते. रोटरी, रेड क्रॉस इत्यादी सामाजिक संस्थांमध्येही ते कार्यरत होते. आपल्या ज्ञातीविषयीही त्यांना बांधिलकी होती. आपल्या संघाला ते सातत्याने भरघोस देणग्या देत असत. ज्ञातीच्या वार्षिक स्नेह संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता.

संघाच्या एका वार्षिक सर्वसाधारणसभेत त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले होते. जानेवारी २००५ साली आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या शताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभात त्यांनाच प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते.संघातर्फे कै. पालेकर यांना हार्दिक श्रद्धांजली.

## श्रद्धांजली

### कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)

३७ वे पुण्यस्मरण – निधन : रविवार२८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३७ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्री मंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या तर्फे**



**निधन**

| | | |
|---|---|---|
| नितीन माधव देसाई | (कडवाड) | माहीम |
| नूतन अतुल जय | | |
| (पूर्वाश्रमीच्या नूतन वासुदेव तेलंग) | (हाखोड) | अमेरिका |
| मालती मधुकर कसबेकर | (कडवाड) | पारले |
| सुजाता सुधाकर कसबेकर | (कडवाड) | मालाड |
| दीपक भवानी कुलकर्णी | (उळगे) | दिंडोशी |
| संध्या भास्कर (राया) नाडकर्णी | (मल्लापूर) | जोगेश्वरी |
| सचिन देवदास नाडकर्णी | (अंकोला) | मीरा रोड |
| गिरीश सदानंद नाडकर्णी | (अंकोला) | विरार |
| शांता (गीता) मंगेश नाडकर्णी | (मल्लापूर) | प्रभादेवी |
| दुर्गाबाई शंकर (कमा) नेत्रावळी | (अंकोला) | पारले |
| विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर | (कडवाड) | वरळी |
| उषा कमलाक्ष पिकळे | (शिरगुंजी) | पनवेल |
| सरिता सदानंद पंडित | | |
| (पूर्वाश्रमीच्या मालती (माली) देवराव पिकळे | (अंकोला) | वाशी |
| सुमित्रा मुरलीधर रेगे | | |
| (पूर्वाश्रमीच्या सुमित्रा रामकृष्ण कुलकर्णी | (हळगे) | पुणे |
| राधा राजेन्द्र फेणाणी | (गांवगेरी) | दादर |
| नलीनी सदानंद संजगिरी | (गांवगेरी) | ग्रांटरोड |
| प्रज्ञा अश्विन सामंत | | |
| (पूर्वाश्रमीच्या प्रज्ञा भवानीशंकर नाडकर्णी) | (सावरपै) | गोरेगांव |
| शिवराव (सतीश) गोविंद तेलंग | (बाड) | कांदिवली |
| दुर्गाबाई (गोदू) लक्ष्मीकांत (भानू) वागळे | (बाड) | बाड |
| मीरा महेश्वर (मयू) वागळे | (माजाळी) | अमेरिका |
| वर्षा अंबादास वर्टी | (बाड) | पुणे |
| शांता वसंत झणकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या शांता रामचंद्र कंटक) | (अंकोला) | माहीम |

(चुकीची दुरुस्ती: मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात 'निधन' या सदरात शैलजा अरविन्द कामत असा उल्लेख आला आहे. तो शैलजा जयवन्त कामत असा हवा होता. चुकीबद्दल क्षमस्व)

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या
## (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

**श्री मारुती दिवेकर यांजकडून वृद्धसेवानिधीसाठी**
**५१ हजार रुपयांची देणगी**

ठाणे येथे राहणारे श्री. मारुती सुब्राव दिवेकर यांना नुकतीच ९० वर्षे पूर्ण झाली. त्याप्रसंगी त्यांनी संघाच्या वृद्ध सेवा निधीसाठी ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री विनायक तेलंग यांजकडून वृद्धसेवानिधीसाठी**
**५० हजार रुपयांची देणगी**

बंगळूर येथे राहणारे श्री. विनायक महाबळेश्वर तेलंग यांना २ जुलै रोजी ८० वर्षे पूर्ण झाली. या सहस्रपूर्ण चंद्रदर्शनच्या प्रसंगी त्यांनी संघाच्या वृद्धसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

श्री दिवेकर व श्री तेलंग उभयतांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. जीवेत् शरदः शतम्.

**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | एन्.के.जी.एस.बी. को.ऑप. बँकेकडून २०२१-२२ करिता | १०,००० |
| २. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ३. | श्री सदानंद कृष्णा देसाई यांजकडून | १२,००० |
| ४. | श्रीमती शैलजा मंगेश नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| ५. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शामल यांजकडून | ५,००१ |
| ६. | श्री अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विद्या व जामात श्री. मनोज गो. भांडारकर यांजकडून | ५,००१ |
| ७. | श्रीमती अनुराधा (निर्मला) बाळकृष्ण वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त बहिणींकडून | १,५०१ |
| ८. | श्रीमती नीलम शांताराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. शांताराम (अरुण) सदानंद कुलकर्णी यांजकडून | ५,००० |
| ९. | श्री. मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ, श्रीमती शालन मधुकर नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त, नाडकर्णी कुटुंबीयांकडून | २५,००० |
| १०. | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी, श्रीमती इंदुमती सदानंद नाडकर्णी, श्री. श्रीपाद शंकर नाडकर्णी व श्रीमती सुलोचना रमेश वाघ यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ४,००४ |



**वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विक्रम मोहन भेडसगांवकर यांच्याकडून | ११,००० |

**वृद्धसेवानिधीसाठी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विक्रम मोहन भेडसगांवकर यांच्याकडून | ११,००० |
| २. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त मुलांकडून | १,००१ |
| ३. | श्री. दीपक जगन्नाथ गायतोंडे (Retd. Joint Chief Fire Officer, Mumbai Fire Brigade) यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. ओंकार यांजकडून | ५,००१ |
| ४. | सर्व वडीलधाऱ्यांच्या स्मरणार्थ श्री. मारुती सुब्राव दिवेकर यांजकडून त्यांच्या ९० व्या वाढदिवसाप्रसंगी | ५१,००० |
| ५. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश नेत्रावळी (भाऊ) यांच्या विवाहदिनाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा वागळे (गीता नेत्रावळी) यांजकडून | १६,००० |
| ६. | श्रीमती सुनेत्रा व श्री. दिनानाथ यशवंत गायतोंडे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती स्वाती व जामात श्री. राजन भालचंद्र वागळे यांजकडून | २,५०० |

| | |
|---|---|
| ७. श्रीमती विमल (वत्सला) व | |
| श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ | |
| पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | २,५०० |
| ८. श्रीमती सुमन नारायण करुर यांच्या जन्मशताब्दी निमित्त | |
| पुत्र श्री. शिवानंद नारायण करुर यांजकडून | १,००१ |
| ९. श्री. विनायक महाबळेश्वर तेलंग यांजकडून | |
| त्यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त | ५०,००० |
| १०. श्रीमती अनुराधा व श्री. भालचंद्र दिनकर देसाई यांच्या | |
| सम्रणार्थ भाचा श्री. आशुतोष श्रीकृष्ण तेंडुलकर यांजकडून | ११,१११ |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**

| | |
|---|---|
| १. श्री. विक्रम मोहन भेडसगांवकर यांच्याकडून | ११,००० |
| २. एन्.के.जी.एस.बी. को.ऑप. बँकेकडून २०२१–२२ करिता | १०,००० |
| ३. श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर | |
| यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त मुलांकडून | १,००१ |
| ४. श्रीमती अनुराधा (निर्मला) बाळकृष्ण वागळे | |
| यांच्या पुण्यतिथीनिमित्त बहिणीकडून | १,५०१ |
| ५. श्रीमती सुनेत्रा व श्री. दिनानाथ यशवंत गायतोंडे | |
| यांच्या स्मरणार्थ कन्या स्वाती व जामात | |
| श्री. राजन भालचंद्र वागळे यांजकडून | २,५०० |
| ६. श्रीमती विमल (वत्सला) व श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे | |
| यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | २,५०० |
| ७. श्रीमती मीनल (मीरा) भालचंद्र गायतोंडे यांच्या | |
| वाढदिवसानिमित्त कन्या डॉ. शुभांगी अविनाश वागळे यांजकडून | ५,००१ |

**ठाणे मंच देणगीदारांची यादी**

| | |
|---|---|
| १. श्रीमती अपर्णा सदानंद देसाई, ठाणे | ५,००० |
| २. श्रीमती शैलजा मंगेश नाडकर्णी, शिवाजी पार्क | १०,००० |
| ३. श्री. लीलाधर सदाशिव सलगर, प्रभादेवी | २,५०० |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

Multiple Rewardz
in One Fixed Deposit



w.e.f. 19.04.2021

| | From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|---|
| General Public | 5.60 % p.a. | 5.75 % p.a. | 5.85 % p.a. |
| Senior Citizen | 5.85 % p.a. | 6.00 % p.a. | 6.35 % p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com
Call us: 022 28602000

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.